CMYK

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 305 वा ■ गुरुवार 29 ऑक्टोबर 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

## सुविचार

जेव्हा तुमचा स्वतःवरील विश्वास दृढ होतो, तेव्हा तोच विश्वास तुमच्या आयुष्यात प्रतिबिंबित होतो.



# धाराशिवच्या राजकारणात नवा पर्याय; डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा पदवीधर मतदारसंघातून विजय

## मतदारसंघावर १८ वर्षांपासून वर्चस्व असलेल्या सतीश चव्हाण यांना घरचा रस्ता, प्रस्थापित घराण्यांना साबळे यांचाही इशारा

आरंभ मराठी - धाराशिव

**गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या मतमोजणी प्रकियेत बुधवारी सायंकाळी अंतिम चित्र स्पष्ट झाले. या निवडणुकीत खरी लढत दिली ती धाराशिव जिल्ह्यातील तिन्ही उमेदवारांनी. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सतीश चव्हाण विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे डॉ. प्रतापसिंह पाटील आणि युवा नेते रविराज साबळे पाटील या तीन उमेदवारांमध्ये तगडी लढत झाली. दुसऱ्या क्रमांकाच्या मतमोजणीत शरद पवार पक्षाचे डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा विजय झाला.त्यांनी सतीश चव्हाण यांना पराभूत केले,तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या रविराज साबळे यांनी जवळपास २० हजार मते घेऊन संभाव्य काळातील सक्षम नेतृत्वाची दिशा अधोरेखित केली. दरम्यान, निकालानंतर धाराशिवच्या राजकारणात नवा पर्याय निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले असून, डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या शांत,संयमी स्वभावाला मतदारांनी साथ दिल्याचे दिसून आले.**

मराठवाडा पदवीधर मतदार संघात अत्यंत चुरशीची निवडणूक झाली.गेल्या अनेक निवडणुकीत आमदार सतीश चव्हाण यांना सक्षम पर्याय नसल्याने ही निवडणूक एकतर्फी होत होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी ही लढत अत्यंत ताकदीने, कौशल्याने हाताळली. त्यांच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी जोर लावलाच पण महायुतीतील अनेक मंत्री,आमदार आणि खासदारांनी उघडपणे मदत केली. शिवाय आमदार सतीश चव्हाण यांच्या १८ वर्षांच्या कार्यकाळात पदवीधरांचे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यावर चव्हाण कधीही व्यक्त झाले नाहीत. किंबहुना त्यांच्यामध्ये असलेल्या अहंकाराची भावना आणि रागीट स्वभावाने त्यांचा घात होणार हे जवळपास निश्चित होते. केवळ त्यांना सक्षम पर्याय मिळण्याची प्रतीक्षा होती. डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या माध्यमातून केवळ सतीश चव्हाण यांना नव्हे तर धाराशिवच्या राजकारणात देखील नवीन पर्याय निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांचा हा विजय धाराशिव जिल्ह्याच्या संभाव्य राजकारणावर देखील प्रभाव निर्माण करणार हे निश्चित. मूळचे कळंब तालुक्यातील धनेश्वरी बोरगाव येथील वेदप्रकाश पाटील यांचे पुत्र डॉ.प्रतापसिंह पाटील हे आमदार झाले. त्यांचे दुसरे पुत्र राहुल पाटील हे परभणी येथील आमदार असून, शेतकरी कुटुंबातील पाटील परिवाराने अत्यंत कष्टाने राजकारणात आपले स्थान निर्माण केले आहे. या निवडणुकीत डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रयत्न केले. वेदप्रकाश पाटील हे माजी कुलगुरू आहेत. तर त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात शिक्षण संस्थांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. दोन्ही मुलांचा राजकारणातील लौकिक त्यांच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

### प्रत्येक फेरीत डॉ प्रतापसिंह पाटील आघाडीवर

या निवडणुकीत वैध मते 1 लाख 77 हजार 115 इतकी होती. तर निर्धारित कोटा 88 हजार 559 इतका होता. मात्र तीन फेरी झाल्यानंतरही एकाही उमेदवाराने निर्धारित कोटा पूर्ण केला नव्हता. पोस्टल मतदानात डॉ पाटील यांनी घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली. पहिल्या फेरीत डॉ प्रतापसिंह पाटील यांना 27994, चव्हाण यांना 20116 तर रविराज साबळे यांना 7424 मते मिळाली. दुसऱ्या फेरीत डॉ पाटील यांना 54095, चव्हाण यांना 43161 तर साबळे यांना 14598 मते मिळाली. तिसऱ्या फेरीत डॉ पाटील यांना 73931, चव्हाण यांना 60768 तर साबळे यांना 19835 मते मिळाली. तिसऱ्या फेरीअखेर डॉ प्रतापसिंह पाटील यांना कोटी पूर्ण करायला 14627 मते हवी होती.

### सलग 36 तास मतमोजणी, अधिकृत घोषणेची उशिरापर्यंत प्रतीक्षा

मतमोजणीची प्रक्रिया मंगळवारी सकाळी आठ वाजता सुरू करण्यात आली होती. सलग 36 तास मतमोजणी झाल्यानंतरही बुधवारी रात्री आठ वाजेपर्यंत अधिकृत निकाल घोषित झाला नव्हता. डॉ प्रतापसिंह पाटील यांचे कार्यकर्ते जल्लोष साजरा करत असले तरी त्यांनाही अधिकृत निकालाची उत्सुकता होती. सोशल मिडियावर मात्र रात्री आठ वाजता डॉ प्रतापसिंह पाटील हे 23 हजारपेक्षा अधिक मताधिक्यांनी विजयी झाल्याचे मेसेज फिरत होते.मात्र, एकंदर निकालाचा कल डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या बाजूने असून,केवळ औपचारिक निकालाची घोषणा बाकी होती.

### धाराशिवमध्ये राजकारणात दोन नवीन पाटील

धाराशिवचे राजकारण पाटील घराण्याशिवाय पूर्ण होत नाही. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी अनेक वर्षे जिल्ह्याच्या राजकारणावर आपला दबदबा कायम राखला.त्यानंतर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचे राजकारण सुरू झाले, त्यांचे चुलत बंधू खासदार ओमराजे निंबाळकर हे त्यांचे कट्टर विरोधक आहेत.पण वर्षानुवर्षे या घराण्याभोवतीच जिल्ह्याचे राजकारण फिरत असताना राजकारणात आमदार कैलास पाटील आणि डॉ.प्रतापसिंह पाटील हे दोन पर्याय निर्माण झाले आहेत. त्यामुळे पाटील आणि राजेनिंबाळकर कुटुंबाला नाकारणाऱ्या वर्गासाठी नवे दोन पाटील आश्वासक चेहरे बनून उभे राहिले तर आश्चर्य वाटणार नाही.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात दोन दिवसांत सप्टेंबरचा हप्ता जमा होणार

**धाराशिव** :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सप्टेंबर महिन्याच्या थकीत हप्त्याची प्रतीक्षा करणाऱ्या महिलांना दिलासा मिळणार आहे. सप्टेंबर महिन्याचा हप्ता महिलांच्या बँक खात्यांवर वर्ग करण्यासाठी राज्य सरकारने बुधवारी ३४४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत लाडक्या बहिणींच्या खात्यांवर सप्टेंबर महिन्याचा हप्ता जमा होण्याची शक्यता आहे. दसरा आणि दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर महिलांना या हप्त्याची प्रतीक्षा होती. सणासुदीच्या काळात घरखर्च, किराणा, कपडे आणि इतर आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी या रकमेचा उपयोग होणार असल्याने हप्ता जमा झाल्यानंतर महिलांना आर्थिक आधार मिळणार आहे. धाराशिव जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जवळपास अडीच लाख महिलांना लाभ मिळत आहे. या योजनेतून जिल्ह्यातील महिलांच्या खात्यांवर सप्टेंबर महिन्याच्या हप्त्यापोटी सुमारे ४० कोटी रुपयांचा निधी जमा होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील लाभार्थी महिलांचे लक्ष आता हप्ता जमा होण्याकडे लागले आहे. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात या योजनेच्या लाभार्थ्यांपैकी विविध कारणांमुळे सुमारे दीड लाख




महिलांची नावे कमी झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे योजनेचा लाभ मिळणाऱ्या महिलांची संख्या आणि लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांचा प्रश्नही चर्चेत आहे. दिवाळीच्या तोंडावर सप्टेंबर महिन्याचा हप्ता मिळण्याची शक्यता असल्याने सध्या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. आता राज्य सरकारकडून निधी वितरणाची प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष रक्कम खात्यात कधी जमा होते, याकडे लाभार्थी महिलांचे लक्ष लागले आहे.

## तेरमध्ये सात एकर ऊस जळून खाक

तेर :- आधीच दुष्काळाच्या झळांनी होरपळून निघालेल्या शेतकऱ्यांच्या संकटात आता आगीच्या घटनांनी भर घातली आहे. धाराशिव तालुक्यातील तेर येथील शेतकरी सतीश बन्सीलाल सोमाणी यांच्या शेतात शॉर्टसर्किटमुळे आग लागून सुमारे सात एकरांवरील ऊस जळून खाक झाला. या आगीत उसासह ठिबक सिंचन संचाचेही मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्याला लाखोंचा आर्थिक फटका बसला आहे. ही घटना सोमवारी (दि.२६) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. तेर शिवारातील गट क्रमांक १०२०, १०२१ आणि १०९८ मधील शेतात सोमाणी यांनी उसाची लागवड केली होती. मात्र, शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागल्याने सुमारे सात एकरांवरील ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. उसासोबत ठिबक सिंचन यंत्रणाही जळून खाक झाल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून परिसरात वारे वाहत असल्याने आग अधिकच पसरली. दुष्काळी परिस्थितीत पाण्याची कमतरता असतानाही मोठ्या कष्टाने जगवलेले ऊसपीक डोळ्यांसमोर जळून खाक झाल्याने सोमाणी यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. आधीच पावसाअभावी शेतीचे नुकसान झाले असताना, आता आगीमुळे उभे पीक आणि सिंचन व्यवस्था दोन्ही गमावण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. या घटनेची माहिती शेतकरी सतीश सोमाणी यांनी महावितरणच्या उपविभागीय कार्यालयाला दिली असून, संबंधित यंत्रणेकडे तक्रारही केली आहे. नुकसानग्रस्त शेताची तातडीने पाहणी करून पंचनामा करावा आणि झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही आग म्हणजे 'दुष्काळात तेरावा महिना' ठरली आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी व्यक्त होत आहे.

**नव नेतृत्व** पदवीधर निवडणुकीत २० हजार मतांची कमाई; भूम-परंडा मतदारसंघात युवा नेतृत्वाची चर्चा, प्रस्थापितांसमोर नवे आव्हान

# रिल स्टार नव्हे, साबळे-पाटील ठरले रिअल स्टार!

आरंभ मराठी । धाराशिव

सोशल मीडियावरील लोकप्रियता प्रत्यक्ष मतदानात उतरवणे सोपे नसते. मात्र, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत रविराज साबळे पाटील यांनी जवळपास २० हजार मते मिळवत आपली ताकद दाखवून दिली. कोणत्याही मोठ्या राजकीय पक्षाचे पाठबळ किंवा स्वतंत्र निवडणूक यंत्रणा नसताना मिळालेल्या या मतांनी भूम-परंडा विधानसभा मतदारसंघात त्यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणारा आणि तरुणांशी थेट संवाद साधणारा हा चेहरा आता स्थानिक राजकारणात नवी समीकरणे निर्माण करणार का, याकडे लक्ष लागले आहे.



स्पष्टवक्तेपणा, निडर भूमिका आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी ही साबळे पाटील यांची ओळख आहे. सोशल मीडियावर त्यांचे लाखो चाहते आहेत. मात्र, केवळ रिल्समधून लोकप्रियता मिळवणारे आणि प्रत्यक्ष मैदानात जनसमर्थन मिळवणारे यांच्यात फरक असतो. पदवीधर निवडणुकीतील त्यांच्या कामगिरीने हा फरक अधोरेखित केला आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण, डॉ. प्रतापसिंह पाटील आणि अन्य उमेदवारांशी स्पर्धा करत साबळे पाटील यांनी तिसऱ्या क्रमांकाची मते मिळवली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारापेक्षा त्यांना अडीचपट मते मिळवली आहेत.बॅलेट पेपरवर होणाऱ्या या निवडणुकीत मतदारांपर्यंत पोहोचणे आणि मते मिळवणे हे आव्हान असते. अशा परिस्थितीत साबळे पाटील यांना मिळालेल्या मतांमुळे त्यांची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. अठरा वर्षांपासून पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सतीश चव्हाण यांच्या पराभवातपाटीलयांची भूमिकानिर्णायकठरली. मात्र, या निवडणुकीतील त्यांची स्वतंत्र मतसंख्या हीच त्यांच्या राजकीय वाटचालीतील महत्त्वाची बाब ठरते. तरुण मतदारांमध्ये त्यांच्याविषयी असलेले आकर्षण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरील त्यांची भूमिका यामुळे त्यांना मिळालेल्या पाठिंब्याची चर्चा वाढली आहे.साबळे पाटील यांचे मूळ गाव भूम-परंडा विधानसभा मतदारसंघात आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी जोडलेले काम, थेट बोलण्याची शैली आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचण्याची क्षमता ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. पदवीधर निवडणुकीत मिळालेल्या मतांमुळे त्यांना स्थानिक राजकारणात आपले स्थान निर्माण करण्याची संधी मिळाली आहे. आता खरी परीक्षा विधानसभा निवडणुकीच्या राजकारणात असेल. पदवीधर मतदारसंघातील पाठिंबा विधानसभा मतदारसंघातही कायम राहतो का, त्याचे संघटनात्मक ताकदीत रूपांतर होते का आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर ते किती प्रभावीपणे काम करतात, यावर त्यांच्या पुढील वाटचालीची दिशा ठरेल. डॉ. तानाजीराव सावंत आणि राहुल मोटे यांच्यासारख्या प्रस्थापित नेत्यांच्या प्रभावक्षेत्रात युवा चेहरा म्हणून साबळे पाटील यांची चर्चा सुरू झाली आहे.

### उदयोन्मुख नेतृत्व

सोशल मीडियावरील लोकप्रियतेला मतांच्या रूपात उतरवण्याची क्षमता त्यांनी दाखवली आहे. त्यामुळे रिल स्टार म्हणून ओळख असलेल्या रविराज साबळे पाटील यांच्याकडे आता केवळ सोशल मीडियावरील चेहरा म्हणून नव्हे, तर भूम-परंड्यातील उदयोन्मुख राजकीय पर्याय म्हणून पाहिले जात आहे.

### मी प्रस्थापित गिळंकृत केलाय

माझ्या पाठीशी राजकीय ताकद नाही, सर्वसामान्य कुटुंबातील मी कार्यकर्ता आहे. पण अवघ्या महिन्याभराच्या कालावधीत मी निवडणुकीत उतरून मराठवाड्यात सर्वत्र पोहोचण्याचा प्रयत्न केला.मतदारांनी माझ्यावर टाकलेला विश्वास ही माझी ताकद असून,जनतेच्या प्रश्नांसाठी लढत राहणार. मी एक १८ वर्षांचा दुष्काळ संपवून एक प्रस्थापित गिळंकृत केलाय.

**रविराज साबळे-पाटील**

## डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या निर्णायक आघाडीनंतर धाराशिवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा जल्लोष




**धाराशिव** :- मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी निर्णायक आघाडी घेतल्यानंतर धाराशिव शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यकर्त्यांनी एकत्र येत विजयाचा आनंद व्यक्त केला. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी मंगळवारी सुरू झाली होती. मतमोजणीची प्रक्रिया बुधवारीही उशिरापर्यंत सुरू होती. मात्र, बुधवारी सकाळीच डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार सतीश चव्हाण यांच्यावर निर्णायक आघाडी घेतल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच धाराशिवमधील कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत जल्लोष केला. निवडणुकीतील निर्णायक आघाडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. अधिकृत निकालाकडे सर्वांचे लक्ष लागलेले असतानाच कार्यकर्त्यांनी विजयाचा विश्वास व्यक्त करत आनंदोत्सव साजरा केला.

CMYK

## आता समस्यांचा निकाल लावा

निवडणुकीचा निकाल लागला की राजकीय वर्तुळात जल्लोष सुरू होतो. विजयी उमेदवारांचे अभिनंदन, समर्थकांची गर्दी, फटाक्यांची आतषबाजी आणि विजयाच्या मिरवणुका यांत काही दिवस वातावरण दुमदुमून जाते. पराभूत गटाकडून निकालाचे विश्लेषण सुरू होते, तर विजयी गट आपापल्या राजकीय ताकदीचे प्रदर्शन करण्यात व्यस्त होतो. मात्र या सगळ्या राजकीय गदारोळात सामान्य माणसाच्या प्रश्नांचे काय होते, हा विचार करण्याचा खरा विषय आहे. कारण निवडणूक संपली म्हणजे जनतेच्या समस्या संपत नाहीत. उलट, निकालानंतरच लोकप्रतिनिधींच्या कामाची खरी परीक्षा सुरू होते. लोकशाहीत विजय हा कोणत्याही नेत्याच्या कर्तृत्वाचा अंतिम दाखला नसतो. तो जनतेने दाखविलेल्या विश्वासाची पावती असतो. या विश्वासाचे रूपांतर विकासकामांत करणे, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि अडचणीच्या काळात लोकांच्या पाठीशी उभे राहणे, ही विजयी लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. निवडणुकीच्या काळात प्रत्येक मतदारसंघात आश्वासनांची बरसात होते. विकासाची स्वप्ने दाखविली जातात, प्रश्न सोडविण्याची ग्वाही दिली जाते आणि जनतेच्या हितासाठी अहोरात्र काम करण्याचे शब्द दिले जातात. मात्र निवडणूक संपल्यानंतर याच आश्वासनांचे काय होते, यावरून राजकारणाची विश्वासार्हता ठरते. धाराशिव जिल्ह्याचा विचार केला तर विकासाचे अनेक प्रश्न आजही उत्तराच्या प्रतीक्षेत आहेत. शेतीवरील संकट, पावसाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण होणारी आर्थिक कोंडी, रोजगारासाठी तरुणांचे स्थलांतर, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांची कमतरता, शिक्षणाचा दर्जा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि रस्त्यांची दुरवस्था अशा अनेक प्रश्नांवर ठोस उपाययोजनांची गरज आहे. शेतकऱ्याला संकटातून बाहेर पडण्यासाठी मदत हवी आहे, तरुणांना रोजगारासाठी दुसऱ्या शहराचा रस्ता धरावा लागू नये, अशी व्यवस्था हवी आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांत धाव घ्यावी लागू नये आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी गाव सोडण्याची वेळ येऊ नये, ही सामान्य जनतेची अपेक्षा आहे. या अपेक्षा अवास्तव नाहीत. त्या नागरिकांच्या मूलभूत गरजा आहेत. मग राजकीय पक्ष बदलतात, सत्तेची समीकरणे बदलतात, नवे चेहरे पुढे येतात; तरीही सामान्य माणसाच्या आयुष्यात अपेक्षित बदल का घडत नाहीत, याचे उत्तर राजकीय व्यवस्थेने दिले पाहिजे. विकासाच्या घोषणा आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांतील अंतर कमी करण्यासाठी केवळ इच्छाशक्ती पुरेशी नाही, तर सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रशासनावर नियंत्रण आणि काम पूर्ण होईपर्यंतची जबाबदारी स्वीकारण्याची तयारीही आवश्यक आहे. पदवीधर मतदारसंघासारख्या निवडणुकीतून मिळणारा कौलही याच दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. सुशिक्षित मतदार केवळ राजकीय समीकरणांचा विचार करून मतदान करतात, असे मानणे चुकीचे आहे. रोजगाराच्या संधी, शिक्षणव्यवस्थेतील प्रश्न, नोकरभरती, युवकांचे भविष्य आणि लोकप्रतिनिधींची उपलब्धता या मुद्द्यांनाही महत्त्व असते. त्यामुळे अशा निवडणुकीत मिळालेला विजय हा केवळ राजकीय प्रतिष्ठेचा विषय न मानता मतदारांच्या अपेक्षा समजून घेण्याची संधी म्हणून पाहिला पाहिजे. विजयी उमेदवाराने मतदारांशी असलेला संपर्क निवडणुकीपुरता मर्यादित न ठेवता त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने उपलब्ध राहिले पाहिजे. राजकारणात व्यक्तींचे विजय-पराभव होतच असतात. मात्र प्रत्येक निकालातून काही संकेत मिळत असतात. पराभूत झालेल्यांनी केवळ मतदारांनी साथ दिली नाही, असा निष्कर्ष काढून चालणार नाही. जनतेशी संवाद कमी पडला का, कामाचा प्रभाव पोहोचला नाही का, नेतृत्वाबद्दल नाराजी होती का, की बदलाची अपेक्षा अधिक प्रबळ होती, याचा प्रामाणिक शोध घ्यावा लागेल. पराभव स्वीकारून चुका दुरुस्त करणारा पक्ष पुन्हा जनतेचा विश्वास मिळवू शकतो. मात्र पराभवाचे खापर इतरांवर फोडून स्वतःची जबाबदारी टाळणाऱ्यांना जनतेच्या मनातील नाराजी समजणार नाही. दुसरीकडे, विजय मिळविणाऱ्यांनीही विरोधकांना कमी लेखण्याची चूक करू नये. निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल हा जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी असतो, विरोधकांची खिल्ली उडविण्यासाठी नाही. राजकीय विरोधकांचे अस्तित्व लोकशाहीसाठी आवश्यक आहे. सत्ताधारी असोत किंवा विरोधात असलेले लोकप्रतिनिधी, जनतेच्या प्रश्नांवर त्यांची भूमिका आणि कामगिरी यांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. सत्ताधाऱ्यांनी काम करावे आणि विरोधकांनी त्या कामावर लक्ष ठेवावे, ही लोकशाहीची अपेक्षित प्रक्रिया आहे. आज राजकारणात प्रसिद्धीला मोठे महत्त्व आले आहे. एखाद्या कामाच्या उद्घाटनाचे छायाचित्र, समाजमाध्यमांवरील संदेश आणि मोठमोठ्या घोषणांमधून कामाची प्रतिमा निर्माण केली जाते. परंतु प्रसिद्धी आणि प्रत्यक्ष काम यात फरक असतो. एखाद्या रस्त्याचे भूमिपूजन झाले म्हणजे रस्ता तयार झाला असे होत नाही. निधी मंजूर झाला म्हणजे योजना नागरिकांपर्यंत पोहोचली असेही होत नाही. सरकारी कार्यालयात फेऱ्या मारणाऱ्या नागरिकाला न्याय मिळाला, शेतकऱ्याच्या नुकसानीची भरपाई वेळेत मिळाली, बेरोजगार तरुणाला संधी उपलब्ध झाली आणि गावातील पाणीप्रश्न सुटला, तरच विकासाचा अर्थ प्रत्यक्षात उतरतो. यासाठी जनतेनेही केवळ निवडणुकीच्या निकालावर समाधान मानून चालणार नाही. आपल्या लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने, मंजूर झालेली कामे, खर्च झालेला निधी आणि प्रत्यक्षात झालेली प्रगती याबाबत प्रश्न विचारले पाहिजेत. लोकशाहीत मतदान करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कामावर लक्ष ठेवणेही महत्त्वाचे आहे. लोकप्रतिनिधींच्या कामाचे मूल्यमापन पक्षनिष्ठेपेक्षा सार्वजनिक हिताच्या निकषांवर झाले, तर राजकारणातील उत्तरदायित्व वाढू शकते.

# तुळजापुरात २० कोटींचा उमेद मॉल; शासनाचा हिरवा कंदील; महिलांच्या उत्पादनांना मिळणार थेट बाजारपेठ

## मंदिरापासून अवघ्या ५०० मीटरवर भव्य मॉल; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**आरंभ मराठी । धाराशिव**



तुळजापूरच्या अर्थकारणाला आणि महिला बचत गटांच्या व्यवसायाला बळ देणाऱ्या उमेद मॉलच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी १९ कोटी ९९ लाख ९९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकाला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. २७ ऑक्टोबर रोजी याबाबतचा शासन निर्णय जारी झाला. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळाली आहे. धाराशिव जिल्ह्यातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, हा उमेद मॉल उभारण्यामागील मुख्य उद्देश आहे. तुळजाभवानीच्या दर्शनासाठी वर्षभर लाखो भाविक तुळजापुरात येतात. या भाविकांपर्यंत स्थानिक महिलांनी तयार केलेली उत्पादने पोहोचवण्याची मोठी संधी या मॉलमुळे उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत १५ हजार ६६४ महिला स्वयंसहाय्यता समूह स्थापन झाले आहेत. या समूहांमध्ये १ लाख ४७ हजार ५२९ कुटुंबांतील महिलांचा समावेश आहे. कृषी उत्पादने, खाद्यपदार्थ, मसाले, धान्य, मध आणि हस्तकलेच्या वस्तूंसह विविध उत्पादनांची निर्मिती या समूहांमार्फत केली जाते. मात्र, उत्पादन तयार केल्यानंतर त्यांची विक्री आणि योग्य दर मिळवणे हे महिलांसमोरील मोठे आव्हान आहे. उमेद मॉलमुळे या उत्पादनांना एकाच ठिकाणी विक्रीची संधी मिळणार आहे. श्री तुळजाभवानी मंदिरापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेत हा मॉल उभारण्यात येणार आहे. तुळजापूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेशी सुसंगत दर्शनी भाग तयार करण्याचीही तरतूद आहे. महिला बचत गटांसोबत ग्रामसंघ, प्रभागसंघ, उत्पादक गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांची उत्पादनेही येथे विक्रीसाठी उपलब्ध होऊ शकतील.

### दोन वर्षांत काम पूर्ण करण्याचे नियोजन

बांधकाम सुरू झाल्यानंतर दोन वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. इमारतीत पावसाच्या पाण्याचे संकलन, सौरऊर्जा, पाणी व वीज बचत आणि पर्यावरणपूरक साहित्याच्या वापरावर भर असेल. दिव्यांगांसाठी रॅम्प व रेलिंगसह आवश्यक सुविधा, तसेच महिला पदाधिकाऱ्यांसाठी प्रसाधनगृह आणि स्वतंत्र विश्रांती कक्षाची तरतूद करण्यात येणार आहे.

### उत्पादनांना बाजारपेठ, महिलांना रोजगार

उमेद मॉलमुळे महिलांना केवळ उत्पादननिर्मितीपुरते मर्यादित न राहता विक्री, ब्रँडनिर्मिती आणि व्यवसायवाढीची संधी मिळू शकते. भाविकांची मोठी वर्दळ असलेल्या तुळजापुरात स्थानिक उत्पादनांची विक्री वाढल्यास ग्रामीण महिलांच्या उत्पन्नात भर पडण्याबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळू शकते. आता प्रशासकीय मान्यतेनंतर प्रत्यक्ष बांधकाम कधी सुरू होते आणि हा मॉल किती प्रभावीपणे बाजारपेठ उपलब्ध करून देतो, याकडे लक्ष लागले आहे.

## रुपामाता नॅचरल शुगर युनिट क्र. २ मध्ये ५१ हजार गुळ पावडर पोत्यांचे पूजन



**आरंभ मराठी । माजलगाव**

बीड जिल्ह्यातील रोशनपुरी येथे असलेल्या रुपामाता नॅचरल शुगर युनिट क्र. २ मध्ये ५१ हजार गुळ पावडर पोत्यांचे पूजन उत्साहात करण्यात आले. रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. श्री संत बुवाजी बुवा महाराज यांच्या पावन भूमीत संतांच्या आशीर्वादाने उद्योगाची यशस्वी वाटचाल सुरू असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. रुपामाता नॅचरल शुगर युनिट क्र. २ या प्रतिदिन १ हजार २५० मेट्रिक टन गाळप क्षमता असलेल्या गुळ पावडर कारखान्यात संचालक शंकर गाडे, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय रामोड, हेड कॉन्स्टेबल संजय राठोड आणि कॉन्स्टेबल इंद्रजीत शेंडगे यांच्या शुभहस्ते गुळ पावडर पोत्यांचे पूजन करण्यात आले. रुपामाता नॅचरल शुगर्सच्या माध्यमातून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेत ऊस गाळपाची सुविधा उपलब्ध होत असून, त्यांच्या उसाला योग्य भाव मिळण्यास मदत होत आहे. गुळ पावडर निर्मितीमुळे कृषी उत्पादनाला मूल्यवर्धन मिळत असून, ग्रामीण भागातील औद्योगिक विकासालाही चालना मिळत आहे. ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोडणी कामगार, वाहतूक ठेकेदार, वाहनचालक तसेच कारखान्यातील विविध विभागांतील कर्मचारी यांच्यासाठी हा उद्योग रोजगार आणि आर्थिक उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन ठरत आहे. कारखान्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, वाहतूक, कृषी सेवा आणि पूरक व्यावसायिक क्षेत्रांनाही चालना मिळत आहे. ग्रामीण भागात गुळ पावडर उत्पादनाचा उद्योग उभारल्यामुळे पारंपरिक ऊस शेतीला औद्योगिक प्रक्रियेची जोड मिळाली आहे. परिणामी, परिसराच्या आर्थिक विकासासाठी पोषक वातावरण निर्माण होत आहे. यावेळी ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांनी उपस्थित शेतकरी, ऊसतोडणी व वाहतूक क्षेत्रातील प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. उद्योगाच्या प्रगतीमध्ये शेतकरी, कामगार, कर्मचारी आणि संबंधित व्यावसायिकांचा सहभाग महत्त्वाचा असून, सर्वांच्या सहकार्याने उद्योगाची वाटचाल अधिक सक्षम होईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रुपामाता उद्योग समूहाची यशस्वी वाटचाल सुरू आहे. या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोडणी व वाहतूक ठेकेदार, वाहनचालक, खातेप्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पाटील यांनी केले.

## सह्याद्रीची कत्तल थांबवा, अन्यथा जनआंदोलन

### शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**आरंभ मराठी । धाराशिव**



टोरांटो पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी सह्याद्रीतील हजारो झाडांची कत्तल सुरू असल्याच्या निषेधार्थ शिवराज्याभिषेक सोहळा समिती, धाराशिव आक्रमक झाली आहे. भिमाशंकर आणि रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरातील वृक्षतोड तातडीने थांबवावी, अशी मागणी समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. विभागीय वन अधिकारी, धाराशिव यांच्यामार्फत हे निवेदन सादर करण्यात आले. कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरात टोरांटो पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी सुमारे २३३ हेक्टर वनजमिनीवरील ३२ हजार ४९० झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आल्याचे समजते. याच पार्श्वभूमीवर गेल्या चार दिवसांपासून भिमाशंकर आणि साय डोंगर परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सह्याद्रीच्या डोंगररांगांमधील हा परिसर जैवविविधतेने समृद्ध आहे. येथे विविध प्राणी, पक्षी, कीटक आणि वनस्पतींचे अस्तित्व आहे. अशा संवेदनशील परिसरातील वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका असून, निसर्गाचे अपरिमित नुकसान होऊ शकते. विकासकामांना विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली मानवी जीवनाचा आधार असलेल्या निसर्गाचा विनाश होता कामा नये, अशी भूमिका समितीने मांडली आहे.साय डोंगर आणि भिमाशंकर परिसरातील सुरू असलेली वृक्षतोड तातडीने बंद करावी, अन्यथा शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक गुंडोपंत जोशी, दत्तात्रय साळुंके, अमोल साळुंके, अविनाश रणखांब, सचिन उमाप, लिंबराज कुंभार, काका कदम, ऋषिकेश माळी, व्यंकटेश राठोड, अजय मुंढे यांच्यासह समितीचे पदाधिकारी आणि मावळे उपस्थित होते.

## सिंचन प्रकल्पांना गती देणार; शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घ्यावेत

**मुंबई,** :- प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीचे नियोजन करावे आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. नागपूर जिल्ह्यातील सर्व उपसा सिंचन योजना आणि पेंच उजव्या मुख्य कालव्याच्या सद्यःस्थितीचा आढावा घेण्यासाठी महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत सिंचन प्रकल्पांची प्रगती, निधीची उपलब्धता, प्रलंबित कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रकल्पांसाठी निधीची कमतरता भासू नये, यासाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार निधीचे पुनर्विनियोजन करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. शेतकऱ्यांची देयके प्रलंबित राहू नयेत आणि सुरू असलेल्या प्रकल्पांच्या कामांवर परिणाम होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्ताव व आवश्यक कागदपत्रे तातडीने तयार करावीत. निधीच्या मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री स्तरावर पाठपुरावा करून पूरक अर्थसंकल्पातील तरतुदींच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# वाढदिवसाचा खर्च टाळून यशदा परिवार दुष्काळग्रस्तांच्या कुटुंबात आनंद फुलवणार

**हार-तुरे, भेटवस्तूंऐवजी गरजू कुटुंबांना किराणा साहित्याची मदत करा, प्रा. सुधीर सस्ते यांचे आवाहन, सामाजिक उपक्रम**

**आरंभ मराठी । धाराशिव**



यंदा दुष्काळाच्या झळांनी शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांचे जगणे कठीण झाले आहे. हाताला काम नाही, घरात पैशांची चणचण आणि अशा परिस्थितीत दिवाळीचा सण आनंदाऐवजी चिंतेची चाहूल देत आहे. मात्र, या कुटुंबांच्या आयुष्यातही दिवाळीचा दिवा उजळावा, त्यांच्या घरात गोडधोड व्हावे आणि मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, या भावनेतून यशदा ग्रुपने मदतीचा हात पुढे केला आहे. यशदा परिवाराचे प्रमुख प्रा. सुधीर दत्तात्रय सस्ते यांनी स्वतःच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हार, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तूंवरील खर्च टाळत दुष्काळग्रस्त कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. यशदाच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना किराणा साहित्य आणि दिवाळीसाठी आवश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात येणार आहे.शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी प्रा. सस्ते यांचा वाढदिवस आहे. यानिमित्त धाराशिव येथील यशदा मल्टिस्टेटच्या मुख्य कार्यालयात साधेपणाने वाढदिवस साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मित्रपरिवार, कौटुंबिक स्नेही आणि हितचिंतकांशी चर्चा करून हा सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

### शुभेच्छांऐवजी गरजूंच्या चेहऱ्यावर हसू फुलवा

वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धतीतून समाजाप्रती असलेली बांधिलकी जपण्याचा हा प्रयत्न आहे. अनेकांच्या घरात दिवाळीच्या खरेदीची लगबग सुरू असताना, दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना सण साजरा करणेही कठीण झाले आहे. अशा वेळी त्यांना किराणा साहित्याची मदत मिळाली, तर त्यांच्या सणाचा भार काही प्रमाणात हलका होऊ शकतो.

### प्रा. सस्ते यांचे आवाहन

माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांनी हार, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू आणण्याऐवजी या उपक्रमात सहभागी व्हावे. गरजू कुटुंबांच्या दिवाळीत आनंद निर्माण करणे, हेच माझ्यासाठी वाढदिवसाचे सर्वात मोठे गिफ्ट आहे, असे आवाहन प्रा. सुधीर सस्ते यांनी केले आहे.

### प्रत्येक शाखेत मदत स्वीकारणार

या उपक्रमासाठी यशदा मल्टिस्टेटच्या प्रत्येक शाखेत किराणा साहित्य आणि आर्थिक मदत स्वीकारली जाणार आहे. त्यानंतर ही मदत गरजूंपर्यंत पोहोचवली जाणार आहे. दानशूर व्यक्ती, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी आपल्या परीने योगदान देऊन दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाचा प्रकाश पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.आपल्या घरातील दिवा उजळतानाएखाद्यागरजूच्याघरातहीआनंदाचादिवापेटावा,हीचयाउपक्रमामागचीभावनाआहे.

## नंदगाव शिवारात शॉर्टसर्किटमुळे पाच एकर ऊस जळून खाक

### खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडून शेतकऱ्याला दिलासा

**आरंभ मराठी । अणदूर**

ऐन दिवाळीच्या तोंडावर आणि भीषण दुष्काळाच्या संकटात नंदगाव (ता. तुळजापूर) येथील शेतकरी मोहन कोरे यांचा पाच एकरांवरील ऊस शॉर्टसर्किटमुळे जळून खाक झाला. अवघ्या चार दिवसांत हा ऊस साखर कारखान्याला पाठविण्यात येणार होता. मात्र, त्यापूर्वीच आग लागल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या नुकसानीचा तातडीने पंचनामा करून शासनाने तसेच महावितरणने भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनेकडून करण्यात येत आहे.

नंदगाव येथील शेतकरी मोहन कोरे यांनी मोठ्या कष्टाने उसाचे पीक जोपासले होते. दुष्काळी परिस्थितीत पिकासाठी केलेला खर्च आणि घेतलेल्या मेहनतीनंतर ऊस तोडणीसाठी तयार झाला होता. चार दिवसांत ऊस साखर कारखान्याला जाणार असल्याने त्यांना आर्थिक उत्पन्नाची अपेक्षा होती. मात्र, महावितरणच्या विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने पाच एकरांवरील ऊस जळून खाक झाला. ऐन दुष्काळात या आगीमुळे कोरे कुटुंबासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. घटनेची माहिती मिळताच धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तातडीने नंदगाव येथे भेट देऊन जळालेल्या उसाची पाहणी केली. त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी मोहन कोरे यांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. तसेच, झालेल्या नुकसानीची माहिती घेत संबंधित शासकीय अधिकारी आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामा करण्याचे निर्देश दिले. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.दुष्काळामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला या घटनेमुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे नुकसानभरपाईची प्रक्रिया विलंब न करता पूर्ण करून शेतकऱ्याला दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. यावेळी ऋषिकेश मगर, माजी सरपंच राम कोरे, ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत अण्णा अरबळे, शेतकरी माणिक चिंनगुंडे, नागेश शिवगुंडे, विक्रम कोरे, बाबा बनसोडे, भरत चव्हाण, महादेव भोसले, शुभम मडोळे, दिनेश बशेट्टी, चेतन अतकरे आदी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-MAHMAR /2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv ( Maharashtra ).

# मुरुडच्या बाजारपेठेवर दुष्काळाचे सावट; आठवडी बाजारात विक्री ठप्प

आरंभ मराठी । मुरुड

**यंदा पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम मुरुडच्या बाजारपेठेवर दिसून येऊ लागला आहे. दर बुधवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात भाजीपाला, फळे, किराणा व इतर वस्तूंच्या खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची संख्या घटली असून, बाजारपेठेत शुकशुकाट जाणवत आहे. दसरा संपून दिवाळी जवळ आली असतानाही बाजारात अपेक्षित खरेदीची लगबग दिसून येत नसल्याने व्यापारी आणि शेतकरी चिंतेत आहेत.**



मुरुडचा आठवडी बाजार हा मुरुडसह परिसरातील सुमारे ४० गावांतील नागरिकांसाठी खरेदीचे महत्त्वाचे केंद्र आहे. या बाजारात दर बुधवारी मोठ्या संख्येने ग्राहक, शेतकरी आणि व्यापारी सहभागी होत असतात. भाजीपाला, फळे, किराणा तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीमुळे बाजारपेठ नेहमी गजबजलेली असते. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे बाजारातील व्यवहार मंदावल्याचे चित्र आहे. शेतांमध्ये पाण्याची कमतरता भासत असल्याने भाजीपाल्याच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. उत्पादन घटल्यामुळे भाजीपाल्याच्या दरात वाढ झाली असून, त्याचा परिणाम सर्वसामान्य ग्राहकांच्या खरेदीवर होत आहे. वाढलेले दर आणि आर्थिक अडचणी यांमुळे ग्राहकांकडून खरेदी करताना हात आखडता घेतला जात असल्याचे बाजारातील चित्रावरून दिसून येते.

## कापड, फर्निचर आणि किराणा व्यवसायही मंदावला

मुरुडची मुख्य बाजारपेठ कापड व्यवसाय, फर्निचर आणि किराणा दुकानांसाठीही ओळखली जाते. सणासुदीच्या काळात या व्यवसायांमध्ये मोठी उलाढाल होत असते. मात्र, यंदा दिवाळी जवळ आली असतानाही या दुकानांमध्ये ग्राहकांची वर्दळ कमी असल्याचे दिसत आहे. त्यामुळे सणासुदीच्या खरेदीवरही दुष्काळाचा परिणाम जाणवत असून, व्यापाऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डातही मंदी

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डमध्येही शेतकऱ्यांची आवक कमी झाल्याचे चित्र आहे. सोयाबीनचे उत्पादन घटल्यामुळे काही शेतकऱ्यांनी बाजारात विक्रीसाठी सोयाबीन आणण्याऐवजी पुढील पेरणीसाठी बियाणे म्हणून घरीच साठवून ठेवण्यास प्राधान्य दिले आहे. त्यामुळे बाजार समितीतील व्यवहारांवरही परिणाम होत आहे.एकूणच, दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीचे उत्पन्न घटणे, भाजीपाल्याचे वाढलेले दर आणि ग्राहकांच्या खरेदीतील मंदी यांचा एकत्रित परिणाम मुरुडच्या बाजारपेठेवर होत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत पुन्हा तेजी येणार का, याकडे व्यापारी, शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत घोषित केली आहे. ते पैसे शेतकऱ्यांना मिळाल्यानंतरच बाजारात काही प्रमाणात हालचाली वाढणार आहेत.

# पांढरेवाडीत महिलांचा पुढाकार; स्वच्छता मोहिमेतून गावाचा चेहरामोहरा बदलला



आरंभ मराठी । भूम

भूम तालुक्यातील पांढरेवाडी येथे महिलांनी एकत्र येत गाव स्वच्छतेचा उपक्रम राबविला. गावात वाढलेले गवत, अस्वच्छ झालेल्या नाल्या आणि ठिकठिकाणी साचलेला कचरा हटवून महिलांनी स्वच्छतेचा संदेश दिला. सखी गाव कृती गटाच्या माध्यमातून स्वच्छता सेवा अंतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला. या स्वच्छता मोहिमेची गटविकास अधिकारी वाजे, दैना मॅडम, विस्तार अधिकारी भोईने, गलांडे आणि ग्रामपंचायत अधिकारी यू. डी. गुळवे यांनी पाहणी केली. महिलांनी एकत्र येऊन गावाच्या स्वच्छतेसाठी घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी कौतुक केले. दरम्यान, सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पांढरेवाडी येथील महिलांनी अधिकाऱ्यांसमोर गावाला पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करावी तसेच गावातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मांडली. या स्वच्छता मोहिमेत सखी गाव कृती गटाच्या समन्वयक अर्पणा हुंबे, रसिका बागल, छाया गायकवाड, अनिता हुंबे, संगीता हुंबे, सुवर्णा हुंबे, रत्नमाला हुंबे, वर्षा हुंबे, सुवर्णा रामराजे मुंडे, प्रमोदिनी हुंबे, अलका हुंबे, शिला हुंबे, कल्पना हुंबे, आशा मुंडे, इंदुबाई हुंबे, दैवशाला हुंबे आदी महिलांनी सक्रिय सहभाग नोंदविला. गावाच्या स्वच्छतेसोबतच दुष्काळातील मूलभूत प्रश्नांकडेही महिलांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

# न्यायाधीश ए. एम. खान यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; उमरगा येथे सुरक्षित बचपन अभियान

आरंभ मराठी । उमरगा

इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर खाते उघडण्यात वेळ घालवण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे, आई-वडिलांची सेवा करावी आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ए. एम. खान यांनी केले. उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये उमरगा तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सुरक्षित बचपन अभियान' कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून न्यायाधीश पी. बी. रेमणे, न्यायाधीश डी. एस. तांबे, अॅड. सोमशंकर स्वामी, अॅड. शिंदे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, धनराज तेलंग यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना न्यायाधीश खान म्हणाले की, बालकांचे लैंगिक शोषण व अत्याचारापासून संरक्षण, सायबर गुन्हेगारी आणि बालकांच्या शोषणाविरोधातील कायद्यांविषयी विद्यार्थ्यांना जागरूक करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार २६ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान देशभरात 'सुरक्षित बचपन अभियान' राबविण्यात येत आहे. इंटरनेट आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे. बालवयात वाहन चालविणे तसेच नियमांना धरून नसतानाही मोबाईलवर इन्स्टाग्राम, फेसबुक यांसारख्या समाजमाध्यमांवर खाती उघडणे टाळले पाहिजे असे त्यांनी सांगितले. यावेळी न्यायाधीश डी. एस. तांबे यांनी बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो कायदा), २०१२ याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. बालकांचे संरक्षण, त्यांचे अधिकार आणि अन्यायाविरोधात कायदेशीर मदत कशी मिळवावी, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री पंडित यांनी केले, तर विद्यानंद सुत्रावे यांनी आभार मानले.

## गुणात्मक परिवर्तनासाठी सर्वेक्षणाची मदत होईल

**मुंबई,** :- शासकीय योजनांची व्याप्ती वाढविणे, अधिकाधिक नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील परिणामकारकता तपासणे महत्वाचे असल्याने यासाठी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनाच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच त्यामध्ये गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. माहिती व जनसंपर्क विभागामार्फत नियुक्त ॲक्सिस माय इंडिया या संस्थेमार्फत विविध विभागांच्या योजनांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यासंदर्भात सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि योजना पश्चात सर्वेक्षणाबाबत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# कोथळी येथील विद्यानिकेतन शाळेत महिलांच्या रांगोळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महिलांनी साकारल्या आकर्षक रांगोळ्या

आरंभ मराठी । मुरुम

भणशारदीय नवरात्रोत्सव व कोजागिरी पौर्णिमेनिमित्त श्री कलेश्वर बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित विद्यानिकेतन पूर्व प्राथमिक विद्यामंदिर, कोथळी येथे महिलांसाठी भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या मातांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित विविध रंगांच्या माध्यमातून आकर्षक व कलात्मक रांगोळ्या साकारल्या. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि पालकांमधील कलात्मकतेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. महिलांनी आपल्या कल्पकतेतून विविध रांगोळ्या साकारत उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व निरीक्षक म्हणून गिरीश पाटील उपस्थित होते. तसेच युसुफ बेग आणि संस्थेचे अध्यक्ष मोहन कांबळे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित




मान्यवरांनी महिलांनी साकारलेल्या रांगोळ्यांचे कौतुक करून त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. या स्पर्धेत संध्या गावडे, इराम्मा बिराजदार, रेखा बिराजदार, चंद्रिका मसरे, प्रिया गावडे, तेजस्विनी गुरव, कामिनी चौगुले, श्वेता कोट्टरगे, रत्नकला मंडले, बबीता मंडले, पीराबाई मंडले आणि अंबिका लिंबाळे यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे आयोजन संस्थेचे सचिव आकाश राजे कांबळे व सहशिक्षिका सौ. उषा आकाश कांबळे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. महिलांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल सहभागी महिला, पालक व मान्यवरांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# भूम–बोरीवली बससेवा पूर्ववत सुरू करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

आरंभ मराठी । भूम

भूम बस आगारातून सकाळी ८ वाजता सुटणारी भूम–बोरीवली एसटी बससेवा बंद असल्याने मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि वैद्यकीय उपचारांसाठी मुंबईला जाणाऱ्या नागरिकांना आर्थिक भुर्दंडासह मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे ही बससेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अन्यथा नागरिक व प्रवाशांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात



येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या भूम बस आगारातील वाहतूक नियंत्रक शिनगारे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जनशक्ती विकास आघाडीचे नगर परिषद गटनेते रुपेश परमेश्वर शेंडगे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भूम–परंडा–वाशी समन्वयक दिलीप शाळू महाराज, नगरसेवक विठ्ठल बागडे आणि नगरसेवक चंद्रमणी गायकवाड उपस्थित होते. प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन एसटी प्रशासनाने सकाळी ८ वाजताची भूम–बोरीवली बस तातडीने सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आता एसटी प्रशासन याबाबत काय निर्णय घेते, याकडे भूमकरांचे लक्ष लागले आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कळंब नगर परिषदेची पाणीगळती रोखण्यासाठी मोहीम

## धनेगाव ते डिकसळ १८ किलोमीटर जलवाहिनीची तपासणी; अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई

**कळंब** :- दुष्काळाचे सावट गडद होत असताना उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी कळंब नगर परिषदेने पुढाकार घेतला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव ते डिकसळ या १८ किलोमीटर लांबीच्या मुख्य जलवाहिनीवरील पाणीगळती रोखणे, नादुरुस्त एअर व्हॉल्व्हची दुरुस्ती करणे आणि अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करण्याची मोहीम नगर परिषदेने हाती घेतली आहे. धनेगाव येथील पंपगृहातून डिकसळ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी वाहून नेणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर गळती होण्यासह एअर व्हॉल्व्हमध्ये बिघाड झाल्यास पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होण्याची शक्यता आहे. सध्या दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्याचा अपव्यय टाळणे आणि शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर नगर परिषदेने संपूर्ण जलवाहिनीची तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. तसेच मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडण्या तोडण्याची कार्यवाहीही करण्यात येत आहे. नगर परिषदेच्या मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामाची पाहणी केली. पाणीपुरवठा विभागातील सुषमा भालेराव, जगन्नाथ बावळे यांच्यासह कर्मचारी जलवाहिनीवरील त्रुटी दूर करण्यासाठी कार्यरत आहेत. दरम्यान, मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडण्या संबंधित नागरिकांनी अधिकृत करून घ्याव्यात; अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा नगर परिषदेने दिला आहे. नागरिकांनी घरातील नळांना तोट्या बसवून पाण्याचा अपव्यय टाळावा. नळातून वाहणारे पाणी रस्त्यावर किंवा गटारीत सोडू नये. तसेच पिण्याच्या पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी करू नये, असे आवाहन मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी केले आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत पाण्याची उपलब्धता टिकवून ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनासोबतच नागरिकांनीही सहकार्य करावे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक आरंभ मराठी

## खामगाव-पंढरपूर पालखी महामार्गावरील निकृष्ट कामांबाबत प्रश्नचिन्ह

# कामे अर्धवट, रस्त्याला तडे; तरी टोल वसुलीची घाई

आरंभ मराठी । येरमाळा

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय पालखी महामार्गावरील केज ते कुसळंब या सुमारे ६० किलोमीटरच्या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सिमेंट कॉँक्रीटच्या रस्त्याला ठिकठिकाणी तडे गेल्याने लोखंडी रॉड आणि केमिकलचा वापर करून दुरुस्ती केली जात असल्याचे दिसत आहे. अनेक गावांमध्ये रस्ते, गटारी, पेव्हर ब्लॉकचे पदपथ आणि पुलांची कामे अपूर्ण असतानाच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून टोल वसुलीची तयारी सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. या महामार्गावरील कामे सविस्तर प्रकल्प अहवालानुसार



(डीपीआर) पूर्ण झाली नसल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. कळंब येथील मांजरा नदीच्या पुलाच्या परिसरासह हसेगाव (केज), आंदोरा, मस्सा (खं.), परतापूर, येरमाळा, धानोरा आणि कुसळंब या गावांमध्ये रस्त्यांच्या दुतर्फा कामे, गटारी व पदपथ अपूर्ण असल्याच्या तक्रारी आहेत. कन्हेरवाडी येथे रस्त्याचे काम दीर्घकाळ रखडले, तर पाथरी परिसरातील काही भागांत रस्त्याची खडी उखडली असून एकेरी रस्त्याचे कामही अपूर्ण आहे. या मार्गावर अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागल्याचा दावा स्थानिक नागरिक करतात.

## आधी कामे पूर्ण करा, मगच टोल घ्या

येरमाळा गावातून जाणाऱ्या महामार्गाचे रुंदीकरण आणि अन्य सुविधा डीपीआरनुसार पूर्ण झाल्या नसल्याची तक्रार आहे. अपूर्ण कामांमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असून वाहनधारकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्याची गुणवत्ता तपासून सर्व अपूर्ण कामे पूर्ण करावीत आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कामे पूर्ण होण्यापूर्वी टोल वसुली सुरू करू नये, यासाठी काही ग्रामपंचायती जनहित याचिका दाखल करण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. त्यामुळे रस्ते विकास महामंडळ आणि संबंधित कंत्राटदार या तक्रारींवर काय भूमिका घेतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## लोहारा–कासार शिरशी महामार्गावरील अपघातात युवकाचा मृत्यू: एक गंभीर

**लोहारा** :- लोहारा–कासार शिरशी महामार्ग क्रमांक २३७ वरील धूळ, उघड्या साईडपट्ट्या आणि रस्त्याच्या कामातील सुरक्षा उपायांचा अभाव यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या महामार्गावर धानोरी पाटीजवळ २६ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास झालेल्या मोटारसायकल अपघातात स्वागत सुशील सरवदे (वय २९, रा. सास्तूर) याचा जागीच मृत्यू झाला, तर वैभव संदेश काळे (रा. ननंद, ता. निलंगा) हा गंभीर जखमी झाला. त्याला पुढील उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. महाराष्ट्र पायाभूत विकास महामंडळाच्या अंतर्गत सुरू असलेल्या या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत आणि वाहनचालकांच्या सुरक्षिततेबाबत स्थानिक नागरिकांकडून यापूर्वीही चिंता व्यक्त करण्यात आली होती. महामार्गावरील धूळ, उघड्या साईडपट्ट्या आणि रस्त्यावर उघड्या पडलेल्या सळ्या व खडीमुळे अपघाताचा धोका वाढत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्यावर नियमित पाणी फवारणी, धोकादायक ठिकाणी सूचना फलक व बॅरिकेड्स लावणे आणि उघड्या साईडपट्ट्यांची सुरक्षित दुरुस्ती करणे आवश्यक असताना संबंधित यंत्रणा व कंत्राटदारांनी पुरेशा उपाययोजना केल्या नसल्याचा आरोपही स्थानिकांकडून होत आहे. या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. जखमी युवक शुद्धीवर आल्यानंतर अपघाताबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त करत महामार्गावरील सुरक्षा उपाय तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

# दुष्काळात तेरावा महिना! अचानक रेशन बंद झाल्याने गरिबांचा दिवाळीत उदरनिर्वाहाचा प्रश्न

## कळंब तालुक्यात हजारो शिधापत्रिकांवरील धान्य बंद झाल्याच्या तक्रारी; दुष्काळात सरसकट रेशन देण्याची मागणी

हर्षवर्धन मडके । आरंभ मराठी

**मोहा – धाराशिव जिल्ह्यात दुष्काळाचे संकट गडद होत असताना दुसरीकडे 'मिशन सुधार' अंतर्गत कळंब तालुक्यातील हजारो शिधापत्रिकांवरील धान्य अचानक बंद झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. दिवाळीच्या सणात घरखर्चाचा ताण वाढलेला असतानाच नियमित मिळणारे स्वस्त धान्य बंद झाल्याने गरीब कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. स्वस्त धान्य दुकानात धान्य घेण्यासाठी गेलेल्या नागरिकांना रेशन बंद झाल्याची माहिती मिळत असल्याने अनेक लाभार्थ्यांना धक्का बसला आहे. दुष्काळ, रोजगाराची कमतरता आणि वाढता खर्च अशा संकटांचा सामना करणाऱ्या कुटुंबांसाठी हा प्रकार म्हणजे 'दुष्काळात तेरावा महिना' ठरत आहे.**





दुष्काळामुळे शेतीचे उत्पन्न घटले आहे, तर ग्रामीण भागातील मजुरी आणि छोट्या व्यवसायांनाही अपेक्षित काम मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. अशा परिस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून मिळणारे धान्य अनेक कुटुंबांच्या अन्नसुरक्षेचा महत्त्वाचा आधार असते. मात्र, अचानक रेशन बंद झाल्याने आता बाजारभावाने धान्य खरेदी करण्याची वेळ लाभार्थ्यांवर येत आहे. दिवाळीच्या काळात सणाचा खर्च आणि घरातील रोजच्या गरजा भागवताना आधीच आर्थिक ओढाताण सुरू असताना धान्य बंद झाल्याने अडचणीत आणखी भर पडली आहे. रेशन बंद झाल्यानंतर बीपीएल, अंत्योदय आणि प्राधान्यक्रम गटातील काही लाभार्थ्यांनी संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांकडे विचारणा केली. त्यावेळी शिधापत्रिका यंत्रणेतून 'डिलीट' झाल्याचे सांगण्यात आल्याचा दावा लाभार्थी करत आहेत. वार्षिक उत्पन्न ४४ हजार रुपयांपेक्षा अधिक असणे, कुटुंबातील व्यक्तीच्या नावे चारचाकी वाहन असणे किंवा कुटुंबातील कोणी आयकर विवरणपत्र (ITR) भरत असणे, अशा कारणांचा उल्लेख करण्यात आल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र, या निकषांची नेमकी अधिकृत तरतूद काय आहे आणि किती कार्डांवरील धान्य कोणत्या कारणामुळे बंद झाले, याबाबत संबंधित विभागाने स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. शि धा प त्रि कां च या पडताळणीदरम्यान मयत व्यक्तींची नावे कायम असणे, दुबार नोंदी, स्थलांतर, पत्ता व प्रत्यक्ष वास्तव्यातील तफावत, अपूर्ण ई-केवायसी, आधार क्रमांकातील विसंगती, कुटुंबातील सदस्यांची दुबार नोंद आणि दीर्घकाळ धान्य न उचलणे अशा बाबी तपासल्या जाऊ शकतात. मात्र, या कारणांमुळे धान्य बंद झालेल्या सर्वच प्रकरणांत लाभार्थी अपात्र आहेत, असे गृहीत धरता येणार नाही. काही प्रकरणांत तांत्रिक त्रुटी किंवा नोंदी अद्ययावत नसण्याची शक्यता असल्याने प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र पडताळणी करून संबंधितांना निर्णयाचे कारण कळविणे गरजेचे आहे. रेशनकार्डमधील त्रुटी दूर करण्यासाठी पाच ते सहा महिन्यांचा कालावधी लागू शकतो, अशी माहिती मिळाल्याचे काही लाभार्थी सांगतात. ही प्रक्रिया इतका काळ चालणार असल्यास दुष्काळाच्या परिस्थितीत संबंधित कुटुंबांनी अन्नधान्याची व्यवस्था कशी करायची, असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांचे धान्य पूर्ववत करण्यासाठी तातडीची व्यवस्था करावी, तसेच तक्रारींचा निपटारा होईपर्यंत गरजू कुटुंबांना धान्यापासून वंचित राहावे लागू नये, अशी मागणी होत आहे. दरम्यान, रेशनकार्ड बंद झाल्याने निर्माण झालेल्या अडचणींचा फायदा घेऊन काही एजंट कार्ड पुन्हा सुरू करून देण्याच्या किंवा नवीन कार्ड काढून देण्याच्या नावाखाली जादा पैसे मागत असल्याच्या तक्रारीही लाभार्थ्यांकडून केल्या जात आहेत. या तक्रारींची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आहे. नागरिकांनी अधिकृत पावतीशिवाय पैसे देणे टाळावे आणि अशा प्रकारांची माहिती संबंधित पुरवठा कार्यालयाकडे द्यावी.

### 'वाहन दारात उभे, रेशन बंद; खायचे काय?'

घरात टाटा कंपनीचे 'छोटा हत्ती' वाहन असल्यामुळे रेशन बंद झाल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. दुष्काळात वाहनाला भाडे मिळत नाही. वाहन दारातच उभे आहे. उत्पन्नाचे साधन ठप्प असताना आता रेशनही बंद झाल्याने दैनंदिन खाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे," अशी व्यथा भीमराव नागटिळक यांनी व्यक्त केली. वाहन असणे आणि त्यातून प्रत्यक्ष उत्पन्न मिळणे या दोन वेगळ्या बाबी असून, संबंधित कुटुंबाची वास्तविक आर्थिक परिस्थिती तपासली जावी, अशी अपेक्षा लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.

### दुष्काळात कार्ड बंद नको; सरसकट रेशन देण्याची मागणी

दुष्काळामुळे रोजगार आणि उत्पन्नावर परिणाम झालेला असताना शिधापत्रिकांची पडताळणी करताना गरजू कुटुंबांच्या अन्नसुरक्षेचा विचार करावा, अशी मागणी होत आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने विशेष निर्णय घ्यावा आणि पात्रतेची फेरपडताळणी पूर्ण होईपर्यंत गरजू लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित ठेवू नये. दुष्काळाच्या काळात शिधापत्रिका बंद करण्याच्या प्रक्रियेत घाई करण्याऐवजी तक्रारींचे तातडीने निराकरण करावे आणि गरजू कुटुंबांना सरसकट रेशन उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये आकाशकंदील स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग



आरंभ मराठी । धाराशिव

श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये दिवाळी सणानिमित्त आयोजित आकाशकंदील बनविण्याच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इयत्ता पाचवी व सहावीच्या विभागातील तब्बल ५०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून आणि कलाकौशल्यातून आकर्षक आकाशकंदील तयार केले. या स्पर्धेत इयत्ता पाचवीतील श्रेयश राठोड, वीर बेले, श्रेयश कोळेकर, उजेर शेख, साईराज पुरंदरे, सौख्या निंबाळकर, ऋषिका गुरव, वैष्णवी महानवार, पूर्वी बनसोडे, कविशा तांबारे आणि मृणाल फिसरेकर यांनी बक्षिसे पटकावली. इयत्ता सहावीतील स्वराली घोडेराव, कार्तिकी पोते, अन्वी लिंगदाळकर, जानवी कांदे, स्वानंदी माळी, मशायक अमीरा, सुहान मुजावर, सकलेन औसेकर, समर्थ ढवाण, रुद्र गंगणे, यश पंगुडवाले आणि अलमगीर मोमीन यांनीही बक्षिसे मिळविली. या स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम आणि इयत्ता सहावीचे पर्यवेक्षक राजेंद्र कदम उपस्थित होते. कार्यानुभव शिक्षिका सौ. पी. डी. परतापुरे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी इयत्ता पाचवीचे पर्यवेक्षक शेषनाथ वाघ, सहशिक्षिका सौ. व्ही. एल. पवार, सौ. एस. डी. बीरगड, सौ. आर. आर. जाधव यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना वाव मिळाला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले आकाशकंदील यंदाच्या दिवाळीत आपल्या निवासस्थानी लावण्याचा संकल्प केला.

# ग्रामीण प्रशालेचे शिक्षक डॉ. बालाजी इंगळे यांची शैक्षणिक संशोधन शिष्यवृत्तीसाठी निवड



**उमरगा** :- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे ग्रामीण प्रशाला, माडज येथील उपक्रमशील शिक्षक डॉ. बालाजी मदन इंगळे यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक संशोधन शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे माडजसह उमरगा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे, विचारक्षमतेच्या वृद्धीचे आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनावे, या दृष्टिकोनातून शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. याच विचारधारेतून डॉ. इंगळे अध्यापनासोबतच शैक्षणिक संशोधनाच्या क्षेत्रातही कार्यरत आहेत. शैक्षणिक संशोधन शिष्यवृत्तीसाठी झालेल्या त्यांच्या निवडीमुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे, अध्यापन प्रक्रियेत अधिक प्रभावी पद्धती विकसित करणे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ घडवून आणण्यासाठी संशोधन करणे, अशा विविध संधी उपलब्ध होणार आहेत. त्यांच्या संशोधनातून ग्रामीण शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर नवे उपाय शोधण्यास तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. डॉ. बालाजी मदन इंगळे यांचे हे यश केवळ वैयक्तिक सन्मान नसून ग्रामीण भागातील शिक्षकांची संशोधनक्षमता, जिद्द आणि शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित करणारे आहे. अध्यापनासोबत संशोधनाची जोड देत शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्याची संधी त्यांना या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळणार आहे. डॉ. इंगळे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामीण प्रशालेचे मुख्याध्यापक रामजी सोळुंके, संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, शाळेतील सर्व शिक्षक आणि पालकांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या पुढील शैक्षणिक संशोधन कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# फार्मर आयडी पोर्टलमधील तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी त्रस्त; सातबाऱ्यावरील नावेही दिसेनात

आरंभ मराठी । भूम

शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य केला जात असताना, त्याच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन यंत्रणेतील तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. संकेतस्थळ संथ चालणे, सर्व्हर उपलब्ध नसणे आणि सातबारा उताऱ्यावर नोंदी असूनही पोर्टलवर नावे दिसत नसल्याने शेतकऱ्यांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. फार्मर आयडीसाठी ऑनलाइन माहिती भरताना संकेतस्थळ उघडत नसल्याने किंवा पुढील प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने शेतकऱ्यांना वारंवार प्रयत्न करावे लागत आहेत. अनेकांना सेतू व महा-ई-सेवा केंद्रांवर चकरा मारूनही रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत. एकीकडे कृषी विभागाकडून फार्मर आयडी काढण्याबाबत सूचना व परिपत्रके जारी केली जात आहेत, तर दुसरीकडे नोंदणीसाठीची यंत्रणाच सुरळीत नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. केवळ आदेश काढण्यापेक्षा ऑनलाइन यंत्रणा सक्षम करून तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी होत आहे. फार्मर आयडी पोर्टलमधील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, सातबारा उताऱ्यावर नोंदी असूनही पोर्टलवर न दिसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावांची समस्या सोडवावी, तसेच तांत्रिक अडचणींमुळे आयडी काढता न आलेल्यांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. नोंदणीतील अडचणींसाठी स्वतंत्र तक्रार निवारण व्यवस्था उपलब्ध करून देण्याचीही गरज व्यक्त होत आहे. ऑनलाइन यंत्रणाच व्यवस्थित चालत नसेल, तर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढायचा तरी कसा? आधी वेबसाइट सुरळीत करा, मगच नोंदणीची सक्ती करा, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

**आरंभ मराठी** महावितरणचा थकीत दीड कोटींचा निधी वर्ग करण्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

# लोहारा तालुक्यातील १६ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा मार्ग मोकळा होणार

## माजी आमदार चौगुले, मोहन पनुरे यांच्या पाठपुराव्याला यश

आरंभ मराठी । लोहारा

धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील १६ गावांसाठी महत्त्वाच्या असलेल्या पाणीपुरवठा योजनेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. योजनेच्या पूर्ततेतील अडथळा दूर करण्यासाठी परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी तातडीने दखल घेत महावितरण कंपनीसाठी थकीत असलेला दीड कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे अनेक दिवसांपासून या योजनेच्या पुढील कार्यवाहीच्या प्रतीक्षेत असलेल्या १६ गावांतील ग्रामस्थांना दिलासा मिळण्याची आशा व्यक्त होत आहे. लोहारा तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी ही योजना महत्त्वाची मानली जाते. मात्र, योजनेशी संबंधित महावितरण कंपनीच्या थकीत निधीचा प्रश्न निर्माण झाल्याने पुढील कार्यवाहीत अडचणी येत होत्या. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी माजी आमदार चौगुले आणि शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख मोहन पनुरे यांनी पुढाकार घेतला. चौगुले आणि पनुरे यांनी मुंबई येथे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन १६ गावांच्या पाणीपुरवठा योजनेसंदर्भात निवेदन सादर केले. या वेळी योजनेतील प्रलंबित प्रश्न तसेच महावितरण कंपनीसाठी आवश्यक असलेल्या थकीत निधीचा मुद्दा त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लक्षात घेऊन या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनाची दखल घेत पालकमंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. महावितरण कंपनीसाठी थकीत असलेला दीड कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्याचे आदेश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती देण्यात आली आहे. निधी वर्ग करण्याबाबत प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही झाल्यास योजनेच्या पुढील कामातील अडथळे दूर होण्यास मदत होऊ शकते. माजी आमदार चौगुले आणि मोहन पनुरे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न पालकमंत्र्यांच्या स्तरावर पोहोचला. त्यांच्या भेटीनंतर निधी वर्ग करण्याबाबत निर्देश देण्यात आल्याने या प्रयत्नांना यश मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, निधी वर्ग करण्याचे आदेश निघाल्यानंतर जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणा प्रत्यक्षात कोणती पावले उचलतात, निधी कधी उपलब्ध होतो आणि त्यानंतर पाणीपुरवठा योजनेच्या कामाला कितपत गती मिळते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ निधी वर्ग करण्याचे आदेश निघण्यापुरते मर्यादित न राहता संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही पूर्ण करून योजना लवकरात लवकर कार्यान्वित करावी, अशी अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असल्याने या योजनेची अंमलबजावणी वेळेत होणे आवश्यक आहे. पालकमंत्र्यांच्या निर्देशांमुळे १६ गावांच्या पाणीपुरवठा योजनेबाबत आशादायक चित्र निर्माण झाले असले, तरी निधीचे प्रत्यक्ष हस्तांतरण आणि त्यानंतरची कामे पूर्ण होण्यावरच ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठ्याचा लाभ कधी मिळणार, हे अवलंबून आहे. त्यामुळे या आदेशाच्या अंमलबजावणीकडे संपूर्ण लोहारा तालुक्याचे लक्ष लागले आहे.



# परंड्यात १०० हून अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट व रामहारी राऊत प्रतिष्ठानचा संयुक्त उपक्रम



आरंभ मराठी । परंडा

दिव्यांग आणि दृष्टिदोष असलेल्या विद्यार्थ्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे, तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी व्हाव्यात, या सामाजिक भावनेतून परंडा येथील बावची विद्यालयात १०० हून अधिक दिव्यांग व दृष्टिदोष असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रामहारी राऊत प्रतिष्ठान, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख तथा आरोग्यदूत उमेश सोनवणे यांचे विशेष सहकार्य लाभले. यापूर्वी विद्यालयातील दिव्यांग व दृष्टिदोष असलेल्या विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करण्यात आली होती. आवश्यक तपासणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी मंत्री आमदार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रामहारी राऊत प्रतिष्ठान, ठाणे यांच्या सहकार्याने दिव्यांग व दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येतात. आर्थिक परिस्थितीमुळे कृत्रिम हात-पाय घेणे शक्य नसलेल्या गरजू व्यक्तींनाही या उपक्रमांच्या माध्यमातून मदत केली जाते. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी सभापती पै. नवनाथ जगताप, पंचायत समिती सभापती तथा तालुकाप्रमुख आण्णासाहेब जाधव, पंचायत समितीचे माजी उपसभापती मेघराज पाटील, संस्थापक विभीषण रोडगे सर, मेजर महावीर तनपुरे, पै. ज्ञानेश्वर रोडगे, मुख्याध्यापक नारायण खैरे, विद्यालयातील शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.